# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०२१ ते ३१ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** :

**(क)** महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे व त्यावरील महालेखापाल (लेखापरीक्षा-१) महाराष्ट्र यांचा अलग लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील महामंडळाचे अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक लेखा अहवाल आणि त्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अलग लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**तीन : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४

---

**(ब) पुर:स्थापनार्थ** :-

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४

**चार : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**(मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**ॲड. आशिष शेलार, श्री. सदा सरवणकर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री मंगेश कुडाळकर, अतुल भातखळकर, प्रकाश सुर्वे, नितेश राणे, अमित साटम, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री योगेश सागर, दिलीप लांडे, ॲड. राहुल कुल, श्री. प्रताप सरनाईक, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. बालाजी किणीकर, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री शांताराम मोरे, राम कदम, विश्वनाथ भोईर, सुनिल कांबळे, महेंद्र थोरवे, मिहिर कोटेचा, सुनिल राणे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती अश्विनी जगताप, गिता जैन, सर्वश्री संजय केळकर, किसन कथोरे, कालीदास कोळंबकर, पराग शाह, महेश लांडगे, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, महेंद्र दळवी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्रीमती विद्या ठाकूर, मंदा म्हात्रे, सर्वश्री गणेश नाईक, रणधीर सावरकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री जयकुमार रावल, हरिभाऊ बागडे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री अभिमन्यू पवार, राम सातपुते, राजेश पवार, सुरेश भोळे, विनोद अग्रवाल, रत्नाकर गुट्टे, समाधान आवताडे, संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री. सचिन कल्याण-शेट्टी, महेश चौघुले, नारायण कुचे, बबनराव लोणीकर, सौ. सीमा हिरे, श्री. किर्तीकुमार भांगडीया, प्रा.डॉ.अशोक उईके, डॉ. संदीप धुर्वे, श्री. नामदेव ससाणे, डॉ. देवराव होळी, सर्वश्री मोहन मते, प्रकाश आवाडे, महेश बालदी, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, डॉ. पंकज भोयर, श्री. समिर कुणावार, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री संजय सावकारे, राजेश पाडवी, हरिष पिंपळे, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री प्रताप अडसड, दादाराव केचे, टेकचंद सावरकर, कृष्णा गजबे, संजिवरेड्डी बोदकुरवार, मदन येरावार, दिलीप बोरसे, ॲड. राहूल ढिकले, सर्वश्री प्रशांत बंब, संतोष दानवे, प्रकाश भारसाकळे, डॉ. तुषार राठोड, डॉ. राजेंद्र शिंगणे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री प्रकाश सोळंके, दिलीपराव बनकर, दिलीप मोहिते, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, श्रीमती सरोज अहिरे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री बाबासाहेब पाटील, यशवंत माने, दिपक चव्हाण, बाळासाहेब आजबे, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, संग्राम जगताप, दौलत दरोडा, इंद्रनील नाईक, चंद्रकांत नवघरे, अतुल बेनके, सुनिल शेळके, सुनिल टिंगरे, निलेश लंके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"गत दिड वर्षाच्या काळात मुंबई शहरामध्ये गृहनिर्माण व गतिशील परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन व विकास हाच केंद्रबिंदू मानून मुंबई शहरात स्मार्ट सिटीच्या

अप्रकाशित

उभारणीव्दारे स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देऊन विकासाची नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भूमीपूजन होऊन कामेही सुरु झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई शहरातील ४५० कि.मी.च्या रस्त्यांच्या क्रॉंक्रीटीकरणाची ६ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कमेच्या कामांची निविदा काढण्यात येऊन सबंधित वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर सबंधित कामांचे भूमीपूजन मा. पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मेट्रो-२ए आणि २बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतूक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने व सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणांकरिता सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एकखिडकी व कालबध्द स्थलांतरण योजना राबविण्याची तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांबाबतीतील शासनाचे धोरण निश्चित करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळांच्या वसाहतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहरातील डीपी प्लॅन व रिंग रोड नव्याने तयार करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्ट्यांची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते हडपसर मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबईतील भेंडीबाजार, धारावी यासारख्या गजबजलेल्या भागांचे पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने उभारण्यात येणारे एसबीयुटी सारखे गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरुत्थान घडविणारे असल्याचे निदर्शनास येणे, धारावीत डीआरपीपीएलच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प राबविण्याचे धोरण करण्यात येणे, मुंबईतील ५६ म्हाडा वसाहतींच्या वाढीव सेवा शुल्काची अंदाजे रु. ४८४ कोटींची रक्कम माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात येणे, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरीटेज टीडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, स्वयं-पुनर्विकासाच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प अधिक गतीमान करण्यासाठी मुंबई

जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादित वाढ करण्यात आली असणे, स्वयं-पुनर्विकास इमारतीतील मूळ रहिवाशांनाही स्टँम्पड्युटीवर सूट देण्याचा निर्णय घेण्यात येणे, स्वयं-पुनर्विकास करताना येणाऱ्या विविध अडचणी/तक्रारी सोडविण्यासाठी जिल्हास्तरीय समितीमध्ये को-ऑप. हौ. फेडरेशनच्या एका सदस्याचा समावेश करण्यात येणे, मुंबईतील ९ मीटर पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवरील गृहनिर्माण संस्थांनाही संपूर्ण चटई क्षेत्राचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील १४ हजारांहून अधिक सेस इमारतींचे त्वरीत स्ट्रक्चरल ऑडिट करुन धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाला गती देण्याचा निर्णय घेण्यात येणे, सीआरझेडचा कायदा बदलून विकास कामांना गती देण्याचे धोरण आणण्याची आवश्यकता, गिरणी कामगारांना घरांसाठी पात्र करुन घेण्यासाठी सर्वात मोठे अभियान राबविण्यात येणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टँम्पड्युटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे, ग्रामीण भागातील शबरी घरकुल योजना शहरातही राबविण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत त्या परिसरातील अनिवासी झोपडीधारक, स्टॉलधारक यांची पात्रता निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु असणे, एमएसआरडीसीच्या माध्यमातून वांद्रे रेक्लमेशन येथील २१ एकर भूखंडाचा पुनर्विकास प्रस्तावित असणे, मुंबईतील म्हाडाच्या ३८८ पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासासाठी व म्हाडा वसाहतीत राहाणाऱ्या रहिवाशांच्या ३५ मागण्यांपैकी १६ मागण्यांबाबत सुधारीत शासन निर्णय जारी करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसनामधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, मुंबईतील झोपडपट्ट्यांचे निर्मूलन करण्याकरिता व धोकादायक इमारतीतील रहिवाशांचे हक्काचे घर मिळविण्याचे स्वप्न साकार करण्याकरिता क्लस्टर विकासाच्या माध्यमातून विविध पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासामधील भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच, झोपडीधारकांना विकासकाविरुध्द महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरूंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरुनगर व टिळकनगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्ष उलटूनही अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरिता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी

निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच, म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, मुंबईतील २१ मंड्यांचा पुनर्विकास प्रगतीपथावर असून त्यापैकी दोन मंड्यांचे बांधकाम पूर्ण, ६ मंड्यांचे बांधकाम पूर्णत्वाकडे व ७ मंड्यांचे आराखडे मंजुरीसाठी सादर असणे, मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाची मार्गिका धारावी येथून जाणार असल्याने त्याकरिता येथील ३,३०८ चौ.मी. इतका भूखंड एमएमआरडीएकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येणे, ठाणे-बोरिवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, वाशी येथील सध्याच्या २ खाडी पुलांना समांतर अशा तिसऱ्या ६ पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, मुंबई-पुणे मिसींग लिंक या ६,७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, या सर्व प्रकल्पांमुळे वाहतूक कोंडी सुटेल व अपघातांचे प्रमाण कमी होईल तसेच, इंधन व वेळेची बचत होऊन प्रदुषणात घट होईल हे उद्दीष्ट असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूची निर्मिती, शिवडी ते न्हावा-शेवा या मुंबई पारबंदर प्रकल्पाची निर्मिती यामुळे मुंबईतील वाहतूक सेवा सुलभ होणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याच्या सहापदरी रुंदीकरणाच्या कामासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, देवनार डंपिंगमध्ये वनस्पतीजन्य सुगंधी फवारणीकरुन त्या भागातील प्रदूषण व दुर्गंधी कमी करण्यात येणे, मुंबईकरांचा प्रवास वेगवान करण्याकरिता निर्माण करण्यात आलेल्या कोस्टल रोडचे काम अंतिम टप्प्यात असणे, मुंबई व उपनगरातील ठाणे-कल्याण इत्यादी भागातील झोपडपट्ट्यांचे समूळ उच्चाटन करुन व पायाभूत सुविधा उभारुन पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली व अधिक गतीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**पाच : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, सुनिल प्रभू, अमीन पटेल, सुरेश वरपुडकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री अमित देशमुख, संग्राम थोपटे, बळवंत वानखडे, कु. प्रणिती शिंदे, श्री. राजू आवळे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री पी.एन. (सडोलीकर) पाटील, संजय जगताप, राजू पारवे, सुनिल भुसारा, उदयसिंह राजपूत, डॉ. नितीन राऊत, ॲड. अशोक पवार, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, रोहित पवार, रमेश कोरगांवकर, लहु कानडे, सुनिल राऊत, सहसराम कोरोटे, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, रणजित कांबळे, राजेश टोपे, बाळासाहेब पाटील, अनिल देशमुख, प्राजक्त तनपुरे, कुणाल पाटील, श्रीमती सुमन पाटील,**

**सर्वश्री मानसिंग नाईक, शिरीष चौधरी, संदिप क्षीरसागर, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री ऋतुराज पाटील, अस्लम शेख, धीरज देशमुख, राजेश एकडे, विकास ठाकरे, सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री झिशान सिद्दीकी, विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात शासनाचे शेतकरीविरोधी धोरण व नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटात सापडला असणे, सोयाबीन, कापूस इ. कृषी मालाची खरेदी हमीभावापेक्षा कमी दराने होत असणे, तक्रार करुनही कारवाई न करता व्यापाऱ्यांना पाठीशी घातले जाणे, सीसीआयच्या जाचक अटींमुळे शेतकऱ्यांचा कापूस अद्याप विकला न जाणे, केंद्र सरकारच्या आयात-निर्यात धोरणातील धरसोडपणामुळे अनेक शेतीमालाचे दर पडले असणे, निर्यातबंदी करुन कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करुन कर्जबाजारी करणे, किडरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात शासनाला आलेले अपयश, ड्रॅगन फ्रुट फळ पीक अनुदानात वाढ करण्याची आवश्यकता, संत्रा, सिताफळ, पेरू, काजू यासारख्या फळप्रक्रिया उद्योगांना बळ देण्याबाबत शासनाची नकारात्मक भूमिका, पिकविमा कंपन्यांमार्फत शेतकऱ्यांची होणारी लूट, त्यामुळे पीक विमा योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देण्याची होत असलेली मागणी, अवकाळी पाऊस व गारपिटीने भाजीपाला, गहू, धान, हरभरा, तूर, ज्वारी, बाजरी इत्यादी पिकांचे तसेच आंबा, काजू, संत्रा, केळी, पानपिंपरी या फळबागांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, धानाला घोषित झालेला २० हजार रुपयांचा बोनस अद्याप न मिळणे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यात ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान जमा न होणे, दुधाचे पडलेले दर तसेच दुधाला ५ रुपये अनुदानाची घोषणा हवेत विरणे, छत्रपती शिवाजी महाराज कृषी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी न करणे, राज्यात शेततळ्यांचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये पसरलेले नैराश्य, शेतकरी आत्महत्या रोखण्यास शासनास आलेले अपयश, राज्यातील धरणांमध्ये विशेषत: विदर्भ व मराठवाड्यात पाणीसाठा कमी असल्यामुळे तसेच भूजल पातळी कमी असल्याने निर्माण होत असलेली भीषण पाणी टंचाई, राज्यात निर्माण झालेल्या कायदा सुव्यवस्थेच्या गंभीर प्रश्नामुळे जनतेमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, पत्रकार निखिल वागळे व सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी यांच्यावर झालेले भ्याड हल्ले, विद्यमान विधानसभा सदस्यांनी पोलीस ठाण्यात केलेला गोळीबार, दहिसर येथे माजी नगरसेवकाची करण्यात आलेली हत्या, महिला व लहान बालिकांवरील लैंगिक अत्याचाराने गाठलेला कळस, खून, बलात्कार, दरोडे, सायबर बुलिंग, सायबर क्राईमच्या गुन्ह्यांमध्ये झालेली भरमसाठ वाढ, परिणामी राज्याची प्रतिमा मलिन होत असणे, राजकीय नेत्यांकडे गुंडांचा वावर वाढला असून पुण्यातील कुख्यात गुंडाने मंत्रालयात घेतलेल्या भेटीमुळे नागरिकांमध्ये निर्माण

झालेले भितीचे वातावरण, तडीपार गुंडांचा राज्याच्या मुख्यालयात राजरोजसपणे सुरु असलेला वावर, पोलिसांच्या पत्नीचा अपमान होईल असे अशोभनीय वक्तव्य सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधीकडून करण्यात आल्याने जनतेमध्ये पसरलेला तीव्र संताप, राज्यात ऑर्केस्ट्रॉच्या नावाखाली सर्रासपणे अवैधरित्या डान्सबार सुरू असणे, मुंबई पोलीस दलात व राज्यात पोलिसांची हजारो पदे रिक्त असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, पोलिसांवर पडत असलेला अतिरिक्त ताण, मराठा, ओबीसी, मुस्लीम, लिंगायत, धनगर समाजाच्या आरक्षणप्रश्नी नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करून आरक्षणावरून समाज-समाजामध्ये तेढ निर्माण करणे, राज्यात अंमली पदार्थांचा झालेला सुळसुळाट, गुटखा, विदेशी सिगारेट, ई-सिगारेट व तत्सम बंदी असलेल्या पदार्थांची बेकायदेशीररित्या ठिकठिकाणी सुरू असलेली विक्री, आदिवासी बांधवांपर्यंत योजना पोहोचविण्यास शासनास आलेले अपयश, शासनाच्या विविध विभागात होत असलेला भ्रष्टाचार, प्रिन्सेस स्ट्रीट ते वांद्रे वरळी या प्रकल्पाचे काम अपूर्ण असतानाही किनारा मार्ग खुला करण्याचा अट्टाहास करण्यात येणे, मुंबई MMR क्षेत्रातील प्रकल्प वेळेत पूर्ण न करता अनेक प्रकल्पांच्या किंमती वाढवून छुप्या पद्धतीने केला जात असलेला गैरव्यवहार, जल जीवन मिशन योजनेमध्ये ठाणे, रायगड, पालघर, नगर व इतर जिल्ह्यात झालेली अनियमितता, राज्यातील अंगणवाडी सेविका व आशा वर्कर्सच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष करणे, अंगणवाडी सेविकांकरिता घेण्यात आलेल्या मोबाईलमध्ये झालेला कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार तसेच अंत्योदय योजनेतील साडी वाटपात झालेला गैरव्यवहार, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाची नियमबाह्य फेररचना व मुख्य अभियंता विद्युत हे पद नियमबाह्यरित्या निरसित करणे, तसेच प्रेसिडेन्सी डिव्हिजन मध्ये होत असलेला भ्रष्टाचार, प्रचंड विरोध असतानाही केवळ कंपन्यांच्या फायद्यासाठी स्मार्ट मीटर योजना सर्वसामान्यांच्या माथी मारणे, सार्वजनिक आरोग्य विभागात औषधांची खरेदी तसेच उपकरणांच्या खरेदीत झालेला भ्रष्टाचार, प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यास राज्य शासनास आलेले अपयश, उल्हासनगर महानगरपालिकेत झालेला करोडो रूपयांचा भ्रष्टाचार, देवस्थान जमिनींची बेकायदेशीररित्या सुरू असलेली विक्री, भूसंपादन प्रक्रियेत झालेले गैरव्यवहार, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डात झालेला भ्रष्टाचार, मिठागरे बुजवून बांधकामांना परवानगी दिल्याने पर्यावरणाचा निर्माण झालेला प्रश्न, निधीवाटपात करण्यात येत असलेला पक्षपातीपणा, पश्चिम विदर्भात सिंचनाचा अनुशेष असणे, पूर्व विदर्भात खारपाण पट्टयात असलेला सिंचनाचा अभाव व त्यामुळे येथे खारपाण विकास महामंडळ स्थापन होण्याची आवश्यकता, स्थानिकांचा विरोध असताना देखील नागरिकांचा विरोध डावलून वाढवण बंदर प्रकल्प पूर्ण करण्याकडे घातलेला घाट, मुंबई-गोवा महामार्गाचे काम दहा वर्षापासून रखडले असल्याने न्यायालयाने शासनाला फटकारणे, राज्यातील शहरांत फुटपाथ नसल्यामुळे गेल्या तीन वर्षांत सुमारे ८ हजार पादचाऱ्यांचा झालेला मृत्यू, राज्यात

वाढत असलेल्या बेकायदा बांधकामांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, पर्ससीन नेट तसेच एलईडी लाईटच्या वापरामुळे सागरी किनारपट्टी भागात मत्स्यदुष्काळाची परिस्थिती निर्माण होणे, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला जाणे, महानंद दुध डेअरी एन.डी.बी.बी.कडे हस्तांतरीत करून गुजरातच्या दावणीला बांधण्याचा घाट घालणे, गेल्या दशकभरात उद्योगधंद्यात झालेली अधोगती, विविध भरती प्रक्रियेत उघडकीस आलेला आर्थिक गैरव्यवहार, तलाठी भरती प्रक्रियेत झालेली पेपरफुटी व गैरव्यवहार, चुकीच्या वाळू धोरणामुळे शासकीय महसूलाचे झालेले नुकसान व वाळू माफियांकडून चढ्या दराने वाळू विक्री केल्याने सर्वसामान्य जनतेची होणारी लूट, विविध विभागात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असताना भरती प्रक्रिया रखडल्या असताना कंत्राटी पद भरती करून आरक्षण संपविण्याकडे सरकारचा कल, भाप्रसे अधिकाऱ्यांच्या जागेवर कनिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यामुळे भाप्रसे अधिकाऱ्यांचे होत असलेले खच्चीकरण, विविध यंत्रणांकडून चौकशी सुरू असलेल्या अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या ठिकाणी नियुक्ती दिल्यामुळे प्रशासनाचा उडालेला बोजवारा, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन नोकरी व पदोन्नती मिळविलेल्या उमेदवारांवर ठोस कारवाई न करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्यात सरकारला आलेले अपयश व त्यामुळे राज्याचे झालेले नुकसान, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

असुधारित प्रत